<u>त्वरीत</u>

जा. क्र. माध्य-३/१४/नमाशा/मान्यता/पुवि/
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे
यांचे कार्यालय
दिनांक:- 8 AUG 1990

प्रति,

सचिव,

महाराष्ट्र आरोग्य मंडळ,

हडपसर पुणे-२८

विषय:- १९९०.९१ या शैक्षणिक वर्षात नवीन माध्यमिक शाळांना परवानगी देण्याबाबत......

संदर्भ:- शासन पत्र क्रं. एसएसएन-१०९०/२२६५/माशि -१
दिनांक:- १३.७.९०

शासनाचे संदर्भीय पत्रान्वये आपल्या संस्थेला नविन माध्यमिक शाळांना परवानगी देण्यावर घातलेल्या सर्वसाधारण बंदीला अपवाद म्हणून खालील दर्शविलेल्या ठिकाणी माध्यमातून विना अनुदान तत्वावर/~~विना अनुदान~~ तत्वावर " विशेष बाब" म्हणून जून १९९० पासून नविन माध्यमिक शाळा सुरू करण्यास, अनुदान संहितेच्या नियमानुसार आवश्यक असणाऱ्या सर्व बाबींची तसेच खालील नमूद केलेल्या विशेष अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवरच परवानगी देण्यात येत आहे.

<u>विशेष अटी:-</u>

अ] या नविन माध्यमिक शाळांना [ इंग्रजी माध्यमाव्यतिरिक्त] शासन निर्णय शिक्षण व सेवायोजन विभाग क्र. एसएसएन-१०८८/१६६९एन/ माशि-१ दि. १०.२.८९ अन्वये विहित केलेल्या नविन सुत्रानुसार अनुदान अनुज्ञेय होईल.

ब] सदर माध्यमिक शाळांनी शासनाच्या वेळोवेळी निघणाऱ्या आदेशाचे [ उदा. विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत इ. ] काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

क] सदर संस्थांची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारक असणे आवश्यक आहे.

ड] इंग्रजी माध्यमांच्या माध्यमिक शाळांसाठी भविष्यकाळात शासनाकडून कोणत्याही प्रकारे अनुदानाची मागणी करण्यात येणार नाही वा आर्थिक दृष्टया मागासलेल्या विद्यार्थ्यांसाठी [ इ.बी.सी. च्या ] फीच्या परताव्याची मागणी करण्यात येणार नाही. अशा आशयाचे संस्थेच्या अध्यक्षाचे सहीचे लेखी हमीपत्र संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालकांना मागवून घेऊन कायम स्वरुपाचे कागदपत्र म्हणून ते सुरक्षितपणे जतन करुन ठेवावे.

<u>इतर अटी:-</u>

१] संबंधित संस्था, मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १८६० या दोन्ही अधिनियमाखाली नोंदणे आवश्यक आहे.

२.........

For Maharashtra Arogya Mandal
Secretary